# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.09.2025** **वारःबुधवार**

---

1. भारतातील सर्वात लहान सेमीकंडक्टर चिप जगात सर्वात मोठा बदल घडवेल-पंतप्रधानांचा विश्वास
2. जीएसटी परिषदेची 56 वी बैठक आजपासून नवी दिल्लीत सुरू
3. महाराष्ट्रात मराठा समाजाला कुणबी जातीचं प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी गावपातळीवर समित्या स्थापन करण्याचा निर्णय आणि
4. देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा.

**<u>सेमी कंडक्टर-मोदी</u>**

भारतातील सर्वात लहान सेमीकंडक्टर चिप जगात सर्वात मोठा बदल घडवेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत सेमिकॉन इंडिया-2025 या संमेलनाचं उद्घाटन करताना व्यक्त केला. देश जागतिक स्तरावर स्वावलंबी आणि स्पर्धात्मक व्हावा यासाठी देशात एक मजबूत सेमीकंडक्टर परिसंस्था निर्माण होत आहे असं मोदी यांनी सांगितलं. तरुण उद्योजक आणि स्टार्ट-अप्सना भारतातल्या सेमिकंडक्टर डिझाइन विषयक ज्ञानाचा आणि या नवोन्मेशपूर्ण परिसंस्थेचा लाभ घेण्याचं आवाहन त्यांनी केलं.

2021 पासून मंजूर झालेल्या 10 सेमीकंडक्टर प्रकल्पांमध्ये 18 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली जात आहे अशी माहिती त्यांनी दिली. येत्या काळात जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठ एक ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त होण्याची अपेक्षा आहे असं त्यांनी सांगितलं. भारताच्या विश्वासार्हतेमुळे जगाला भारताबरोबर सेमीकंडक्टर क्षेत्रात भविष्य घडवायचं आहे असं मोदी म्हणाले. जगभरातील अर्थव्यवस्था विविध आव्हानांना तोंड देत असताना, भारताने 7 पूर्णांक 8 दशांश टक्के विकास दर गाठला आहे, असंही मोदी यांनी नमूद केलं.

सेमिकॉन इंडिया 2025 परिषद ही भारताच्या सेमीकंडक्टर डिझाइन, उत्पादन आणि तंत्रज्ञान विकासाचं केंद्र बनण्याच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. जागतिक उद्योगपती आणि तज्ज्ञांच्या सहभागामुळे, भारताच्या सेमीकंडक्टर क्षेत्रात गुंतवणूक, नवोपक्रम आणि वाढ होण्यास चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. या संमेलनात बारा सामंजस्य करारांची घोषणा करण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी स्वदेशी चिप्सचा पहिला संच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर केला. पंतप्रधान आज मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या गोलमेज परिषदेतही भाग घेणार आहेत. 48 होऊन अधिक देशांमधील अडीच हजार पेक्षा जास्त प्रधिनिधी या परिषदेत सहभागी होणार आहेत.

**<u>गोयल CII</u>**

अक्षय उर्जेच्या क्षेत्रात शाश्वततेच्या वचनबद्धतेची पूर्तता करण्यात भारत जी वीस देशांपैकी एक सर्वोत्तम देश आहे असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत काल CII च्या 20 व्या जागतिक शाश्वतता शिखर परिषदेला संबोधित करताना गोयल बोलत होते. 2014 पासून देशानं आपल्या अक्षय ऊर्जेचं उद्दिष्ट पाच पटीनं वाढवलं असून एक राष्ट्र, एक ग्रिड हे तत्त्व यशस्वीरीत्या अमलात आणलं आहे अशी माहिती त्यांनी दिली.

**<u>गडकरी-शिखर परिषद</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2070 पर्यंत देशाला शून्य कार्बन उत्सर्जनाकडे घेऊन जाण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे असं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ हा मोठा धोका असून कोणत्याही देशासाठी किंवा समाजासाठी पर्यावरणाबरोबरच नैतिकता, अर्थव्यवस्था आणि पर्यावरणशास्त्र हे तीन घटक खूप महत्वाचे आहेत असं त्यांनी नमूद केलं.

**<u>जीएसटी परिषद</u>**

वस्तु आणि सेवा कर म्हणजे जीएसटी परिषदेची 56 वी बैठक आजपासून नवी दिल्लीत सुरू होत आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन या दोन दिवसांच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. या परिषदेत जीएसटी मधील सुधारणांवर चर्चा होण्याची अपेक्षा असून कर दरांचे सुसूत्रीकरण आणि सुलभीकरण यांचा यात समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर्षी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात याबाबत सुतोवाच केलं होतं. ह्या नवीन सुधारणा दिवाळीत जाहीर होण्याची अपेक्षा आहे.

**<u>अपेडा-भारती</u>**

भारताच्या कृषी-अन्न निर्यातीला चालना देण्यासाठी कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण म्हणजे अपेडानं भारती नावाचा नवीन उपक्रम सुरू केल्याचं काल नवी दिल्लीत एका बैठकीत सांगण्यात आलं. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान आणि संयुक्त अरब अमिरातीचे परराष्ट्र व्यापार मंत्री डॉक्टर थानी बिन अहमद अल झयौदी या बैठकीला उपस्थित होते. 100 कृषी-अन्न स्टार्टअप्सना पाठिंबा देणं नवोपक्रमाला प्रोत्साहन देणं आणि 2030 पर्यंत निर्यात 50 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवणं हे भारती या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे.

**<u>सिंगापूर पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोन्ग यांचं काल संध्याकाळी नवी दिल्ली इथं आगमन झालं. उभय नेत्यांमध्ये आज द्विपक्षीय चर्चा होणार आहे. आपल्या या तीन दिवसांच्या भारत भेटीत सिंगापूरचे पंतप्रधान राष्ट्रपती द्रौपदी मुरमू यांची भेट घेतील. उभय देशांच्या पंतप्रधानांमध्ये परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही चर्चा होणार आहे. केंद्र सरकारच्या ॲक्ट ईस्ट धोरणानुसार, सिंगापूर हा भारताचा विकास यात्रेतील महत्त्वाचा भागीदार असून उभय देशांमधील परस्पर सौहार्दाचे संबंध आता धोरणात्मक भागीदारीमध्ये परावर्तित झाले आहेत, असं भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>सीतारामन</u>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवी दिल्ली इथं सिंगापूरचे पंतप्रधान लॅरेन्स वोंग यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. यामध्ये उभय देशांमधील व्यापार आणि गुंतवणूक, आर्थिक व्यवहार, कौशल्य विकास, शाश्वत विकास, आरोग्य सुविधा आणि दळणवळण इत्यादी क्षेत्रातील धोरणात्मक भागीदारी वाढविण्याबाबत चर्चा झाली. यावेळी दोन्ही देशांच्या नेत्यांनी परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्यास मान्यता दिली. भारत आणि सिंगापूर देशांमधील धोरणात्मक भागीदारीला यंदा साठ वर्ष पूर्ण होत असून त्या अनुषंगाने सिंगापूरच्या पंतप्रधानांचा भारत दौरा दोन्ही देशांच्या परस्पर संबंधांना अधिक बळकटी देण्यासाठीची वचनबद्धता सुस्पष्ट करणारा आहे.

**<u>आरक्षण</u>**

महाराष्ट्र सरकारनं काल मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख मागण्या मान्य केल्यामुळे त्यांनी आंदोलन मागे घेतलं. हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचं प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी गावपातळीवर समित्या गठीत करण्याचा निर्णय काल घेण्यात आला. मराठा समाजातील भूधारक तसंच भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईनं शेती करत असलेल्या व्यक्तींकडे शेत जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांनी 13 ऑक्टोबर 1967 पूर्वीचं वास्तव्य दाखविणारं प्रतिज्ञापत्र सादर

करायचं आहे. तसंच, त्यांच्या कुळातील किंवा नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचं प्रमाणपत्र मिळालं असल्यास आणि त्यांनी अर्जदारासंबंधी प्रतिज्ञापत्र दिल्यास, स्थानिक समिती आवश्यक चौकशी करून अहवाल सादर करेल. सक्षम प्राधिकारी या चौकशीच्या आधारे अर्जदाराला कुणबी जातीचा दाखला देण्याचा निर्णय घेतील. याबाबत कार्यपध्दती करण्यात आलेला शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहे. न्यायालयातही हा निर्णय टिकेल असा संवैधानिक तोडगा काढण्यात यश आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**<u>अफगाणिस्तान-भूकंप</u>**

पूर्व अफगाणिस्तानात झालेल्या विनाशकारी भूकंपातील मृतांची संख्या 1400 हुन अधिक झाली आहे तर हजारो लोक जखमी झाले आहेत. बचाव कार्य सुरू असताना रविवारी अफगाणिस्तानच्या पूर्व भागात 6 रिक्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला. भारतानं अफगाणिस्तानला मानवतावादी दृष्टिकोनातून मदत पाठवली आहे. काल 21 टन मदत साहित्य विमानाने पाठवण्यात आलं.

**<u>सुदान भूस्खलन</u>**

सुदानमध्ये, पश्चिम दारफूर प्रदेशात झालेल्या एका मोठ्या भूस्खलनामुळे डोंगर उतारावरील एक संपूर्ण गाव जमीनदोस्त झाले. या गावातील एक हजार लोकांचा मृत्यू झाला असून केवळ एक जण वाचला आहे. गेले काही दिवस या भागात मुसळधार पाऊस होता. हा परिसर सुदान मुक्ती चळवळीच्या अमलाखाली आहे

**<u>माओवादी अटक</u>**

छत्तीसगडमध्ये, सुरक्षा दलांनी गेल्या 24 तासांत बिजापूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणांहून सोळा माओवाद्यांना अटक केली आहे. जिल्हा राखीव रक्षक आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांनी जिल्ह्यात माओवादविरोधी मोहीम राबवली होती. त्यांच्या ताब्यातून स्फोटके आणि इतर साहित्य जप्त करण्यात आलं आहे.

**<u>बुद्धिबळ</u>**

जागतिक कनिष्ट गटातील विजेता प्रणव वेंकटेशने स्पेनच्या ग्रँडमास्टर ॲलन पिचॉटवर विजय मिळवत संयुक्त अरब अमिरातीत झालेल्या फुजैराह ग्लोबल सुपरस्टार्स बुद्धिबळ स्पर्धेत विजेतेपद पटकावलं.

**<u>हवामान</u>**

जम्मू-काश्मीर, लडाख, छत्तीसगड, पूर्व राजस्थान, गुजरात, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मध्य प्रदेश, हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि हिमाचल प्रदेश, ओडिशा आणि विदर्भातील काही ठिकाणी आज मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. देशाच्या ईशान्य भागात आणि दक्षिणेकडेही अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. येत्या आठवड्यात देशाच्या पूर्वेकडील राज्यांमध्ये आणि मध्य भागात वादळ आणि विजांसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल असा हवामान खात्याचा अंदाज आहे. पुढील पाच दिवसांत कोकण आणि गोवा किनाऱ्यावर मच्छीमारांनी जाऊ नये असा सल्लाही देण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.